(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

(२०१९) १ एस सी आर ४६३

स्नेहलता गोयल

विरुद्ध

पुष्पलता आणि इतर

(दिवाणी अपील क्र. ११६ /२०१९)

७ जानेवारी २०१९

[न्या. डॉ. डी. वाय. चंद्रचूड आणि न्या. हेमंत गुप्ता.]

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ – कलम २१ आणि ४७ – वाटणीचा दावा दाखल करण्यात आला – प्राथमिक हुकूमनामा (आदेश) कायम करणारा अंतिम आदेश पारित करण्यात आला – तसेच, पूरक अंतिम आदेश देखील पारित करण्यात आला – अपीलकर्त्याने अंतिम आदेशाच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही दाखल केली – प्रथम उत्तरवादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ४७ अंतर्गत आक्षेप (हरकत) घेतला असा दावा करत की, पारित केलेले आदेश अधिकारिता नसतानाही पारित केले गेले आहेत आणि त्यामुळे ते निरर्थक आहेत – अंमलबजावणी न्यायालयाने

ते नाकारले – प्रथम उत्तरवादीने राज्यघटनेचे अनुच्छेद २२७ अंतर्गत या मुद्दयास आव्हान दिले – उच्च न्यायालयाने असे नमूद केले की, अंमलबजावणी न्यायालयाने आदेशाच्या वैधतेबाबत असलेला आक्षेप स्वीकारण्यासाठी त्याला अधिकारिता नाही असे मानून चूक केली – आक्षेप नमूद केलेला अर्ज अंमलबजावणी न्यायालयाच्या फाइलमध्ये पुनरस्थापित करण्यात आला. निर्णय दिला की: प्रादेशिक अधिकारीतेबद्दलचा आक्षेप हा दिवाणी न्यायालयाच्या दावा स्वीकारण्याच्या मूळ प्रश्नाशी किंवा अधिकारीता नसण्याशी संबंधित नाही – असा आक्षेप प्रथम न्यायालयासमोर लवकरात लवकर संधी मिळताच घेतला पाहिजे, आणि सर्व प्रकरणांमध्ये, जिथे मुद्दे निकाली निघाले आहेत किंवा मुद्दे निकाली निघण्यापूर्वी घेतला गेला पाहिजे. शिवाय, न्याय मिळण्यात अपयश आले असावे तेव्हाच दावा दाखल करण्याच्या ठिकाणाबद्दलचा आक्षेप स्वीकारला जाऊ शकतो – या दोन्ही अटींची दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ अंतर्गत पूर्तता करणे आवश्यक आहे – प्रस्तुतच्या प्रकरणात, अंमलबजावणी कार्यवाहीमध्ये घेतला गेलेला आक्षेप हा अधिकारितेबाबतचा आक्षेप आहे, जो दिवाणी न्यायालयाला दावा स्वीकारण्याची अधिकारिता नसण्याशी संबंधित नाही – अशा प्रकारचा आक्षेप अंमलबजावणी न्यायालयासमोर घेता येणार नाही – अंमलबजावणी न्यायालयाने आदेशाची

पडताळणी करू नये आणि त्यास जसे आहे तसे अंमलात आणावे - अंमलबजावणी न्यायालयाने योग्यरीत्या त्या आक्षेपाला नाकारले, जो प्रादेशिक अधिकारिता नसण्याशी संबंधित होता आणि जो न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस विरोध करत होता – उच्च न्यायालयाने चुकीचे नमूद केले की अंमलबजावणी न्यायालयाच्या अधिकारितेत हे ठरवणे होते की वाटणीसाठीच्या दाव्यावरील आदेश प्रादेशिक अधिकारितेशिवाय पारित करण्यात आला होता का – उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय रद्द करण्यात आला – भारताची राज्यघटना – अनुच्छेद २२७.

अपील मंजूर करताना, न्यायालयाने

नमूद केले की : १.१ कलम २१ च्या उपकलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की, अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालयासमोर प्रादेशिक अधिकारीतेवर आक्षेप घेण्यापूर्वी, दोन पूर्वअटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:

१) आक्षेप प्रथम न्यायालयासमोर लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेला पाहिजे; आणि

२) परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले असावे.

प्रादेशिक अधिकारीता नसल्याबद्दलचा आक्षेप दिवाणी न्यायालयास दावा

स्वीकारण्याची अधिकारिता नसण्याशी संबंधित नाही. म्हणूनच, हा आक्षेप प्रथम न्यायालयासमोर लवकरात लवकर संधी मिळताच स्वीकारला गेला पाहिजे, आणि तो सर्व प्रकरणांमध्ये, जिथे मुद्दे निकाली निघाले आहेत किंवा मुद्दे निकाली निघण्यापूर्वी घेतला पाहिजे. शिवाय, परिणामी न्याय मिळण्यात अपयश आलेले असावे तेव्हाच दावा दाखल करण्याच्या ठिकाणाबद्दलचा आक्षेप स्वीकारला जाऊ शकतो. या दोन्ही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. [परिच्छेद ९][४६९-एफ-एच; ४७०-ए-बी]

१.२ प्रस्तुत प्रकरणात अंमलबजावणीच्या कार्यवाहीत घेतला गेलेला आक्षेप दाव्याच्या विषयाशी संबंधित नाही. तो प्रादेशिक अधिकारीतेशी संबंधित होता,जो दिवाणी न्यायालयाला दावा स्वीकारण्यासाठी अधिकारिता नसल्याच्या मूळ प्रश्नाशी किंवा अंतर्निहित अधिकारीतेच्या अभावाशी संबंधित नाही. असा आक्षेप अंमलबजावणी न्यायालयासमोर घेतला जाऊ शकत नाही. उच्च न्यायालयाने हा निष्कर्ष काढण्यात चूक केली की वाटणीच्या दाव्यातील आदेश प्रादेशिक अधिकारिता नसताना पारित झाला होता का, हे ठरवण्याचा अधिकार अंमलबजावणी न्यायालयाच्या अधिकारितेत होता. उच्च न्यायालयाने अंमलबजावणी न्यायालयाच्या त्या निर्णयाला उलटवणे, ज्याने योग्य पद्धतीने आदेशाची अंमलबजावणी करण्यास नकार दिला होता, हा अधिकारितेच्या मर्यादेचा अतिरेक आहे. [परिच्छेद १४, १५ आणि १७][४७५-सी ; ४७६-ए-बी, सी-डी]

हर्षद चिमनलाल मोदी विरुद्ध डीएलएफ युनिव्हर्सल लि. **(२००५) ७ एससीसी ७९१ : [२००५] ३ पूरक एससीआर ४९५;** हिरालाल विरुद्ध कालीनाथ **एआयआर १९६२ एससी १९९ : [१९६२] एससीआर ७४७;** हाशम अब्बास सय्यद विरुद्ध उस्मान अब्बास सय्यद **(२००७) २ एससीसी ३५५ : [२००६] १० पूरक एससीआर ७४०;** मंटू सरकार विरुद्ध ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि.**(२००९) २ एससीसी २४४ : [२००८] १७ एससीआर ७५३;** वासुदेव धनजीभाई मोदी विरुद्ध राजाभाई अब्दुल रहमान **(१९७०) १ एससीसी ६७० : [१९७१] १ एससीआर ६६ – भिस्त ठेवली .**

किरण सिंग विरुद्ध चमन पासवान एआयआर **१९५४ एससी ३४० : [१९५५] एससीआर ११७ – संदर्भित.**

उल्लेखलेले विधी निर्णय संदर्भ

[१९५५] एससीआर ११७	**संदर्भित केले**	**परिच्छेद ८**
[२००५] ३ पूरक एससीअर ४९५	**भिस्त ठेवली**	**परिच्छेद ८**
[१९६२] एससीअर ७४७	**भिस्त ठेवली**	**परिच्छेद १३**
[२००६] १० पूरक एससीआर ७४०	**भिस्त ठेवली**	**परिच्छेद १३**

[२००८] १७ एससीआर ७५३ भिस्त ठेवली परिच्छेद १३

[१९७१] १ एससीआर ६६ भिस्त ठेवली परिच्छेद १

दिवाणी अपीलीय अधिकारक्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक ११६/२०१९.

झारखंड उच्च न्यायालय, रांची यांच्या रिट याचिका (सी) क्रमांक ३२९८/२०१६ मधील १७.०७.२०१८ रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

मुकुल रोहतगी, ज्येष्ठ वकील ; समदर्शी संजय , श्यामल कुमार, सुनील तोमर,अपीलकर्त्याचे वकील.

एस. आर. सिंग, ज्येष्ठ वकील; मंगल प्रसाद, सुनीता पंडीत, कृष्ण कुमार यादव, अवनीश सिंह, अंकुर यादव, डी. एस. परमार, मिस.सुजीता श्रीवास्तव,उत्तरवादीचे वकील.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **डॉ. धनंजय वाय चंद्रचूड, न्यायाधीश** यांच्या द्वारा अधिघोषीत करण्यात आला.

१. अनुमती मंजूर.

२. प्रस्तुत अपील झारखंड उच्च न्यायालय, रांची यांनी दिनांक १५/१७ जुलै २०१८ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशातून उद्भवले आहे.

३. तथ्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:

९ मे १९८५ रोजी, मयत राय श्री कृष्ण याची कन्या श्रीमती सरोजा राणी हिने रांची आणि वाराणसी येथील मालमत्तांमधील तिच्या १/४ व्या हिस्स्याबाबत एक वाटणीचा दावा [1] दाखल केला. हा दावा रांची येथील विशेष कनिष्ठ न्यायाधीशांच्या न्यायालयात दाखल केला गेला. त्या दाव्यातील प्रतिवादीने (जो आता मयत झाला आहे) पाटणा उच्च न्यायालयात रांची न्यायालयांचे अधिकारितेबाबत प्रश्नार्थक एक अर्ज दाखल केला. हा अर्ज १० मे १९८९ रोजी उच्च न्यायालयाने निकालात काढला आणि निर्देश दिले की , अधिकारितेबाबत असलेला कोणताही आक्षेप रांची येथील विशेष कनिष्ठ न्यायाधीशाने प्राथमिक मुद्याच्या रूपात ठरवावा. १३ जून १९९० रोजी एक प्राथमिक आदेश एकतर्फी पारित करण्यात आला, ज्यात अर्जदारास १/४ व्या हिस्स्याचे अधिकार देण्यात आले. ५ एप्रिल १९९१ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आला, ज्यात १३ जून १९९० रोजी पारित केलेल्या प्राथमिक आदेशाची पुष्टी केली गेली.

वाटणीच्या दाव्यातील एका प्रतिवादीने [2] रांची येथील कनिष्ठ न्यायाधीशांच्या न्यायालयात हक्काबाबत दावा दाखल केला. २२ जुलै २००३ रोजी, दावा न चालवला गेल्यामुळे फेटाळला गेला. प्रथम उत्तरवादीने वाराणसी येथील कनिष्ठ न्यायाधीशांच्या

1 १५४/१९८५
2 ११४ /१९९८

न्यायालयात हक्काबाबत दावा दाखल केला[3] जो १२ एप्रिल २००५ रोजी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ नुसार फेटाळला गेला कारण तो भारतीय दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (सीपीसी) च्या कलम २१ ए अंतर्गत प्रतिबंधित होता. प्रथम उत्तरवादीने रांची येथे दाखल केलेल्या हक्काबाबत दाव्यासाठी आदेश ९, नियम १३ अंतर्गत अर्ज दाखल केला, जो १९ फेब्रुवारी २००८ रोजी मागे घेतला गेल्याने फेटाळला गेला.

अपीलकर्त्याची आई दावा दाखल करतांना जिवंत होती, त्यामुळे दावा १/४ व्या हिस्स्यापुरता मर्यादित होता. दावा प्रलंबित असताना, अपीलकर्त्याची आई मयत झाली. त्यानंतर तीन बहिणींच्या हिस्स्यांत बदल झाला आणि प्रत्येकाचा हिस्सा १/३ झाला. १८ डिसेंबर २०१३ रोजी, रांची येथील कनिष्ठ न्यायाधीशांनी अपीलकर्त्याची आई आणि प्रथम उत्तरवादी ९ फेब्रुवारी १९९६ रोजी मयत झालेच्या पार्श्वभूमीवर एक पूरक अंतिम आदेश पारित केला.

४. १२ मे २०१४ रोजी, अपीलकर्त्याने रांची येथील अंतिम आदेशाच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही दाखल केली [4]. १ जानेवारी २०१५ रोजी, प्रथम उत्तरवादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ४७ अंतर्गत आक्षेप दाखल केला , ज्यात त्याने १३ जून १९९० चा आदेश, ५ एप्रिल १९९१ चा अंतिम आदेश आणि १८ डिसेंबर २०१३ चा पूरक

3 १७६/२०००
4 ५/२०१४

अंतिम आदेश, अधिकारिता नसताना पारित केला गेला असल्याचे सांगितले आणि म्हणून तो निरर्थक असल्याचा दावा केला. १० मार्च २०१५ रोजी, प्रथम उत्तरवादीने १३ जून १९९० च्या आदेशाला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९६ अंतर्गत अपील दाखल करून आव्हान दिले [5]. अपील प्रलंबित आहे.

५. १० मार्च २०१६ रोजी, अंमलबजावणी न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ४७ अंतर्गत प्रथम उत्तरवादीचे आक्षेप खालील निरीक्षणासह फेटाळले:

> "आदेशधारकास आदेशाचा लाभ मिळवण्याचा हक्क आहे आणि अंमलबजावणी न्यायालयाला आदेशाची पडताळणी करण्याचा अधिकार नाही. जेव्हा न्यायालय असा आदेश पारित करते, ज्याला अंतर्निहित अधिकारिता नसते, तेव्हा आदेशाच्या वैधतेविषयीचा आक्षेप अंमलबजावणी कार्यवाहीत घेता येईल जर तो आक्षेप अभिलेखावर दिसून येत असेल तर. परंतु जर न्यायालयाच्या अधिकारीतेविषयीचा आक्षेप अभिलेखावर दिसून येत नसेल आणि खटल्यामध्ये मांडलेल्या आणि निर्णीत केलेल्या प्रश्नांची पडताळणी करावी लागत असेल, जे मांडता येतील परंतु मांडले गेले नाहीत, तर अंमलबजावणी न्यायालयाला न्यायालयाच्या

5 ४३/२०१५

अधिकारितेच्या कारणावर आदेशाच्या वैधतेविषयीचा आक्षेप स्वीकारण्याचा अधिकार नाही."

अंमलबजावणी न्यायालयाच्या आदेशामुळे नाराज झालेल्या प्रथम उत्तरवादीने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२७ अंतर्गत कार्यवाही सुरू केली. उच्च न्यायालयाने त्याच्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशात असा निष्कर्ष काढला की, अंमलबजावणी न्यायालयाने आदेशाच्या वैधतेविषयीच्या आक्षेपाला प्रादेशिक अधिकारिता नसल्याच्या कारणावर स्वीकारण्यास असमर्थ असल्याचे सांगून चूक केली आहे.

६. उच्च न्यायालयाने निरीक्षण केले की, आदेशाची अंमलबजावणी केली जाऊ शकत नाही, कारण तो अशा न्यायालयाने पारित केला आहे ज्याला वाटणीचा दावा स्वीकारण्याची प्रादेशिक अधिकारिता नाही, असा युक्तिवाद दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ४७ अंतर्गत केला जाऊ शकतो. उच्च न्यायालयाने नमूद केले कि :

"अंमलबजावणी न्यायालयाने कायद्यात गंभीर चूक केली आहे, जिथे त्याने निरीक्षण केले आहे की अंमलबजावणी न्यायालयाला अधिकारितेच्या कारणावर आदेशाच्या वैधतेविषयीचा आक्षेप स्वीकारण्याचा अधिकार नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ४७ अंतर्गत, अर्जदाराने आदेशाच्या

वैधतेवर मुद्देसुद आव्हान दिलेले नाही, उलट तिचा युक्तिवाद असा आहे की, आदेशाची अंमलबजावणी केली जाऊ शकत नाही कारण तो अशा न्यायालयाने पारित केला आहे ज्याला वाटणी दावा क्रमांक १५४/१९८५ स्वीकारण्याची प्रादेशिक अधिकारिता नाही."

त्यामुळे आक्षेप असलेला अर्ज अंमलबजावणी न्यायालयाच्या फाइलवर पुन्हा पुनर्स्थापित केला गेला आणि निकाली काढण्यासाठी पाठविला गेला.

७. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरोधात, या कार्यवाही सुरु करण्यात आल्या आहेत .

श्री. मुकुल रोहतगी, अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील, यांनी सादर केले की, प्रादेशिक अधिकारितेवरील आक्षेप दिवाणी न्यायालयाच्या अंतर्निहित अधिकारीतेशी संबंधित नाही. असा आक्षेप त्या न्यायालयासमोर घ्यावा लागतो आणि जर न्यायालयाने असा आक्षेप नाकारला, तर तो योग्य न्यायालयासमोर अपीलात घेतला जावा. परिणामी, उच्च न्यायालयाने अंमलबजावणी न्यायालयाला अशा आक्षेपाकडे लक्ष देण्याची सूचना देऊन चूक केली. शिवाय, हेही सादर करण्यात आले की, उत्तरवादीला सुरु असलेल्या कार्यवाहींची माहिती होती, जे

पुढील परिस्थितींमधून स्पष्ट होते:

(१) उत्तरवादीने रांची येथील न्यायालयात हक्का बाबत दावा दाखल केला होता, जो २२ जुलै २००३ रोजी न चालवला गेल्यामुळे फेटाळला गेला;

(२) उत्तरवादीने वाराणसी येथील न्यायालयात हक्का बाबत दावा दाखल केला, जो १२ एप्रिल २००५ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७, नियम ११ अंतर्गत फेटाळला गेला; आणि

(३) उत्तरवादीने रांची येथील दाखल केलेल्या हक्का बाबतच्या दाव्यासाठी आदेश ९, नियम १३ अंतर्गत एक अर्ज दाखल केला, जो १९ फेब्रुवारी २००८ रोजी मागे घेतल्याने फेटाळला गेला.

या परिस्थितींच्या आधारावर, असा युक्तिवाद करण्यात आला की, अंमलबजावणीमध्ये घेतलेला आक्षेप हा फक्त वाटणीच्या दाव्यात पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये विलंब आणि अडथळा आणण्यासाठीचा एक प्रयत्न आहे.

८. दुसरीकडे, श्री.एस. आर. सिंग, उत्तररवादीच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील, यांनी पुढील युक्तिवाद मांडले:

(१) प्रादेशिक अधिकारीता नसल्याबाबतचा आक्षेप हा दाव्याच्या विषयाशी संबंधित आक्षेप आहे आणि म्हणून तो अंमलबजावणी न्यायालयासमोर घेतला जाऊ शकतो. त्या समर्थनार्थ, त्यांनी या न्यायालयाने **किरण सिंग विरुद्ध चमन पासवान**[6] **आणि हर्षद चिमन लाल मोदी विरुद्ध डीएलएफ युनिव्हर्सल लि**[7] या प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयांवर भिस्त ठेवली .

(२) उच्च न्यायालयाचा आक्षेपित आदेश हा एक अंतरिम आदेश आहे आणि म्हणून भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १३६ अंतर्गत या टप्प्यावर आक्षेप स्वीकारणे उचित नाही; आणि

(३) उत्तरवादींचे प्रकरण नेहमीच असेच होते की, रांची येथे ज्यावर आधारित अधिकारिता ठरवली गेली होती, त्या मालमत्तेवर सामायिक पूर्वजांची मालकी नाही, आणि अशा स्थितीत रांची येथील दिवाणी न्यायालयाला वाटणीचा दावा स्वीकारण्याची अधिकारिता नाही.

९. विरोधी युक्तिवादांच्या गुणवतेचे मूल्यमापन करतांना, सुरुवातीला दिवाणी प्रक्रिया संहिता (सीपीसी)च्या कलम २१ च्या तरतुदींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

---

6 एआयआर १९५४ एससी ३४०

7 (२००५) ७ एससीसी ७९१

"कलम २१(१) मध्ये अशी तरतूद आहे की, दावा चालवण्याच्या ठिकाणाबाबत असलेला आक्षेप कोणतेही अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालय स्वीकारणार नाही (मान्य करणार नाही), जर आक्षेप प्रथम न्यायालयात लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेलेला नसेल आणि अशा सर्व प्रकरणांमध्ये, जिथे मुद्दे निर्णीत झालेले आहेत किंवा निर्णीत होण्यापूर्वी घेतला गेला नसेल तर आणि परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले नसेल तर.

(२) कोणतेही अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालय त्या न्यायालयाच्या क्षमतेविषयी असलेला आक्षेप स्वीकारणार नाही, ज्याचा संदर्भ त्याच्या आर्थिक अधिकारितेच्या मर्यादेशी आहे, जर असा आक्षेप प्रथम न्यायालयात लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेला नसेल तर, आणि अशा सर्व प्रकरणांमध्ये जिथे मुद्दे निकाली निघाले आहेत किंवा मुद्दे निकाली निघण्यापूर्वी तो घेतला गेला नसेल तर आणि परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले नसेल तर.

(३) कोणतेही अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालय अंमलबजावणी न्यायालयाच्या क्षमतेविषयी असलेला आक्षेप स्वीकारणार नाही, ज्याचा संदर्भ त्याच्या आर्थिक अधिकारितेच्या मर्यादेशी आहे, जर असा आक्षेप प्रथम न्यायालयात लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेला नसेल तर, आणि अशा सर्व प्रकरणांमध्ये जिथे

मुद्दे निकाली निघाले आहेत किंवा मुद्दे निकाली निघण्यापूर्वी तो घेतला गेला नसेल तर आणि परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले नसेल तर ."

कलम २१ च्या उप-कलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की, अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालयात प्रादेशिक अधिकारितेवर आक्षेप घेण्यापूर्वी दोन पूर्वअटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:

१) आक्षेप प्रथम न्यायालयात लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेला पाहिजे; आणि

२) परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले असेल.

ही तरतुद जी विधिमंडळाने संकल्पपूर्वक अवलंबली आहे, ती स्पष्टपणे दर्शवते की, प्रादेशिक अधिकारिता नसल्याबाबतचा आक्षेप दिवाणी न्यायालयाच्या दावा स्वीकारण्याच्या अंतर्निहित अधिकारीतेशी संबंधित नाही. म्हणूनच, हा आक्षेप प्रथम न्यायालयात लवकरात लवकर संधी मिळताच घेतला पाहिजे, आणि अशा सर्व प्रकरणांमध्ये जिथे मुद्दे निकाली निघाले आहेत किंवा निकाली निघण्यापूर्वी तो घेतला गेला पाहिजे आणि परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले असेल तर. शिवाय, केवळ तेव्हाच प्रादेशिक अधिकारितेवर असलेला आक्षेप स्वीकारला जाऊ शकतो, जेव्हा न्याय

मिळण्यात अपयश आल्याचे दिसून येते. या दोन्ही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. उत्तरवादीचे वतीने उपस्थित वकिलांनी सादर केले की, प्रादेशिक अधिकारिता नसल्याबाबतचा आक्षेप न्यायालयात लेखी उत्तरात मांडला गेला. परंतु, स्पष्टपणे सांगता येईल की, उत्तरवादी कार्यवाहीमध्ये सहभागी होण्यास अपयशी ठरले आणि दावा एकतर्फी निर्णयित केला गेला. कलम २१(१) मध्ये अशी स्पष्ट सांविधिक तरतूद आहे की, अशा प्रकारचा आक्षेप मुद्दे निकाली निघताना किंवा निकाली निघताना लवकरात लवकर संधी मिळताच घेतला गेला पाहिजे. शिवाय, जोपर्यंत दोन्ही अटींची पूर्तता होत नाहीत तो पर्यंत अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालयात असा आक्षेप घेण्याला देखील परवानगी नाही.

११. उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलांनी या न्यायालयाच्या चार न्यायधीशांनी **किरण सिंग** (उपरोल्लेखित) या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयावर मोठी भिस्त ठेवली आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात, दाव्याच्या मूल्यांकन बाबत बाबत वाद होता. हा मुद्दा शेवटी ठरवेल की, न्यायचौकशी न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर अपील कोणत्या मंचासमोर येईल. जर दाव्याचे मूल्यांकन, जे दाव्यात दिले गेले होते, स्वीकारले गेले, तर अपील जिल्हा न्यायालयासमोर येईल. दुसरीकडे, जर उच्च न्यायालयाने ठरवलेले मूल्यांकन स्वीकारले गेले, तर अपील उच्च न्यायालयासमोर येईल आणि जिल्हा न्यायालयासमोर

येणार नाही. ह्या पार्श्वभूमीवर, या न्यायालयाने नमूद केले की, मूलभूत तत्त्व म्हणून, अधिकारिता नसताना पारित केलेला न्यायनिर्णय निरर्थक असतो आणि त्याची वैधता जिथे तो अंमलात आणला जात आहे किंवा त्यावर अवलंबून राहिले जात आहे, तिथे अगदी अंमलबजावणीच्या टप्प्यावर देखील मांडली जाऊ शकते. शिवाय, असेही नमूद केले की, अधिकारीतेतील दोष, आर्थिक किंवा प्रादेशिक किंवा कार्यवाहीच्या विषयाशी संबंधित असो, तो न्यायालयाच्या आदेश पारित करण्याच्या अधिकारीतेस विरोध करतो आणि तो पक्षकारांच्या सहमतीने सुधारित केला जाऊ शकत नाही.

त्यानंतर न्यायालयाने दावा मूल्यांकन अधिनियम, १८८७ च्या कलम ११ चा या मूलभूत तत्त्वावर होणारा परिणाम पडताळला . या न्यायालयाने नमूद केले कि :

"७. कलम ११ मध्ये अशी तरतूद आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता (सीपीसी) च्या कलम ५७८ मध्ये काहीही नमूद असले तरी, जर न्यायालय ज्याला दावा किंवा अपीलावर अधिकारिता नव्हती, त्याने अधिक किंवा कमी मूल्यांकनामुळे अधिकारिता वापरली असेल, तर अपिलीय न्यायालयाने तो आक्षेप स्वीकारू नये, कलमामध्ये तरतूद केल्याखेरीज. न्यायालयाने पारित केलेल्या आदेश, ज्याला दावा किंवा अपील ऐकण्याची अधिकारिता नाही, परंतु अधिक किंवा कमी मूल्यांकनामुळे, तो त्या कलमामुळे निरर्थक आणि अमान्य मानला जाऊ नये, आणि प्रादेशिक अधिकारितेवर आधारित आक्षेपाला त्या कलमांतर्गत

हाताळले जावे, अन्यथा नाही. या कलमाच्या प्राथमिक शब्दांमध्ये कलम ५७८, जे सीपीसीचे सध्याचे कलम ९९ आहे, याचा उल्लेख महत्त्वाचा आहे. त्या कलमात, अशी तरतूद असताना की आदेशामध्ये नमूद केलेल्या दोषांमुळे अपीलमध्ये कोणताही आदेश उलटवला किंवा बदलला जाऊ नये, तेव्हा ते अधिकारितेच्या अंमलबजावणीतील दोष वगळता प्रकरणाच्या गुणवत्तेवर परिणाम करत नाहीत. त्यामुळे, कलम ९९ प्रकरणाच्या गुणवत्तेवर आधारित दिलेल्या आदेशांना कोणतीही संरक्षण प्रदान करत नाही,जेव्हा न्यायालये अधिक किंवा कमी मूल्यांकनामुळे अधिकारिता नसताना असे आदेश पारित करतात. या परिणामापासून वाचण्यासाठी कलम ११ अधिनियमित केले गेले. यामध्ये अशी तरतूद आहे आहे की, अधिक किंवा कमी मूल्यांकनावर आधारित न्यायालयाच्या अधिकारितेबाबत असलेला आक्षेप अपीलीय न्यायालयाने त्यामध्ये दिलेल्या पद्धतीनुसार आणि त्यानुसार कलमात नमूद केलेल्या प्रमाणात स्वीकारू नये. हे एक स्वतंत्र आणि संपूर्ण कलम आहे, आणि अधिक किंवा कमी मूल्यांकनावर आधारित असलेला कोणताही आक्षेप अटी आणि नियम पाळूनच घेतला जाऊ शकतो. प्रादेशिक अधिकारीतेशी संबंधित आक्षेपा संदर्भात,_दिवाणी प्रक्रिया संहिता (सीपीसी) च्या कलम २१ मध्ये अशी तरतुद आहे की, अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालयाने दाव्याचे ठिकाणा बाबत कोणताही आक्षेप स्वीकारू नये, जर त्याचे परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले नसेल तर. हीच तत्वे

दावा मूल्यांकन अधिनियमाचे कलम ११ मध्ये आर्थिक अधिकारीते संदर्भात स्वीकारली गेली आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता (सीपीसी) च्या कलम २१ आणि कलम ९९ आणि दावा मूल्यांकन अधिनियमाच्या कलम ११ च्या मागील धोरणे समान आहेत, म्हणजेच, जेव्हा एखादे प्रकरण न्यायालयाने गुणवत्तेवर पडताळले आणि निर्णय दिला, तेव्हा ते_फक्त तांत्रिक कारणांवरून उलटवता येऊ नये, जर त्याचे परिणामी न्याय मिळण्यात अपयश आले नसेल तर आणि कायद्याचे धोरण असे आहे की प्रादेशिक आणि आर्थिक अधिकारीतेबद्दलचे आक्षेप तांत्रिक मानले जातात आणि अपिलीय न्यायालयाद्वारे त्यावर विचार केला जाऊ शकत नाही, जोपर्यंत प्रकरणाच्या गुणवत्तेवर त्याचे परिणाम होत नाही तोपर्यंत." (यावर भर देण्यात आला.)

१२. हा प्रश्न हाताळताना की अपीलात आदेश, पारित करणाऱ्या न्यायालयाला ज्याला फक्त कमी किंवा अधिक मूल्यांकनामुळे अपील स्वीकारण्याचा अधिकार प्राप्त झाला असेल तो या कारणावर रद्द केला जाऊ शकतो की खऱ्या मूल्यांकनावर ते न्यायालय अपील स्वीकारण्यास सक्षम नव्हते, त्या संदर्भात न्यायालयाने असा निर्णय दिला की, मंचातील केवळ बदल हा दावा मूल्यांकन अधिनियमच्या कलम ११ अंतर्गत 'पूर्वग्रह ' म्हणून मानला जात नाही. न्यायालयाने नमूद केले की:

१२. ...या कलमाच्या भाषेतून वेगळ्या निष्कर्षावर पोहोचणे अशक्य आहे.

जरी अपील एका कनिष्ठ न्यायालयाने किंवा जिल्हा न्यायालयाने ऐकले, असते, जरी योग्य मूल्यांकन दिले असते, तरी अपील उच्च न्यायालयात दाखल करावे लागले असते, जर दिलेले अचूक मूल्यांकन ही स्वतःची पूर्वग्रहदूषित बाब असती तर. कनिष्ठ न्यायालय किंवा जिल्हा न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय, अधिक काही न करता, रद्द केला पाहिजे आणि 'त्यानंतर त्याचे अधिक किंवा कमी मूल्यांकन त्याच्या योग्य निकालावर नकारात्मक परिणाम करत असेल' या शब्दांचा उपयोग पूर्णपणे निरर्थक होईल. हे शब्द स्पष्टपणे दर्शवितात की, अशा प्रकरणांतील निर्णय अपीलीय न्यायालयात हस्तक्षेप करण्यायोग्य आहेत, परंतु सर्व प्रकरणात नाही आणि त्या त्या प्रकरणानुसार, परंतु जर त्या कलमात नमूद केलेल्या परिणामी. आणि त्या कलमाने दर्शविलेला परिणाम जो केवळ अपील वेगळ्या मंचसमोर ऐकले गेल्यापेक्षा अन्य काही असावा लागतो. विरोधी निष्कर्षामुळे एक आश्चर्यकारक परिणाम होईल, की सदर कलम अधिक किंवा कमी मूल्यांकन मुळे निर्माण होणाऱ्या न्यायालयीन अधिकारीतेच्या दोषांचे निवारण करण्याच्या उद्देशाने अधिनियमित करण्यात आले, पण प्रत्यक्षात, हा उद्देश साधला गेलेला नाही. त्यामुळे, आमचे स्पष्ट मत आहे की,कलमाद्वारे विचार

केलेला पूर्वग्रह हा एक मंचावर सुनावली झालेल्या अपीलच्या वस्तुस्थितीपेक्षा काहीतरी वेगळा आहे जो अंतिमतः ठरवल्याप्रमाणे योग्य मूल्यांकनावर ऐकण्यास सक्षम नसता. (यावर भर देण्यात आला.)

न्यायालयाने अधिकारितेवरील आक्षेप नाकारला कारण तो पहिल्या टप्प्यावर घेतला गेला नाही आणि त्या पक्षकाराला, ज्याने दावा दाखल केला, त्याला अपीलाच्या टप्प्यावर न्यायालयाच्या अधिकारितेवर आक्षेप घेण्यापासून प्रतिबंधित केले गेले होते. या संदर्भात, या न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की :

"१६. जर कायदा असा असता की, न्यायालयाचा आदेश ज्या न्यायालयाला दावा किंवा अपील स्वीकारण्याची अधिकारिता नाही, परंतु तो मूल्यांकनाच्या चुकांमुळे निरर्थक झाला, तर अर्थातच, त्यांनी स्वतः त्याचा वापर केल्यामुळे न्यायालयाच्या अधिकारितेशिवाय विषय मांडण्यापासून त्याला रोखले जाणार नाही. तथापि, दावा मूल्यांकन अधिनियमाचे कलम ११ अंतर्गत हि स्थिती नाही."

अश्याप्रकारे, जिथे अधिकारीतेतील दोष असा आहे जो दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ किंवा दावा मूल्यांकन अधिनियम १८८७ चे कलम ११ मध्ये समाविष्ट होतो, तिथे

अधिकारितेवरील आक्षेप केवळ त्याच प्रकारे आणि त्या अंतर्गत दिलेल्या अटींनुसारच घेतला जाऊ शकतो. उत्तरवादीच्या प्रकरणाला मदत करण्यापासून दूर, **किरण सिंग** (उपरोल्लेखित)या प्रकरणात न्यायनिर्णयात नमूद केले गेले आहे की प्रादेशिक आणि आर्थिक अधिकारितेवरील आक्षेप हे विषयासंदर्भातील अधिकारितेवरील आक्षेपापेक्षा वेगळे आहेत. प्रादेशिक अधिकारिता नसल्याबाबतचा आक्षेप हा दिवाणी न्यायालयाला अंतर्निहित अधिकारिता नसल्याशी संबंधित नाही.

१३. **हिरालाल विरुद्ध कालीनाथ**[8] या प्रकरणात एका व्यक्तीने मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ न्यायशाखेवर, त्याला देय असलेले कमिशन वसूल करण्यासाठी एक दावा दाखल केला. हे प्रकरण लवादाकडे संदर्भित करण्यात आले आणि त्यात वादीच्या बाजूने निकाल दिला गेला. निकालाच्या अटींवर आदेश पारित करण्यात आला आणि नंतर तो मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात समाविष्ट केला गेला. अंमलबजावणी कार्यवाहीत, न्यायनिर्णित ऋणकोने युक्तिवाद केला की कारवाईचे कारण मुंबईत उद्भवलेच नाही, आणि म्हणून, मुंबई उच्च न्यायालयाला त्या कारणावर सुनावणी करण्याची अधिकारिता नाही आणि त्यानंतरची सर्व कार्यवाही अधिकारितेशिवाय होती आणि म्हणून ती निरर्थक आहे. हा युक्तिवाद नाकारताना, या न्यायालयाच्या चार न्यायाधीशांच्या खंडपीठाने नमूद केले की:

---

8 एआयआर १९६२ एससी १९९

“(मुंबई उच्च न्यायालयाच्या) अधिकारीतेवरील आक्षेप हा न्यायालयाच्या क्षमता संदर्भातील आक्षेप नाही आणि म्हणून तो माफ केला जाऊ शकतो. या प्रकरणात, जेव्हा याचिकाकर्त्याने लेटर पेटंट अधिनियमाचे कलम १२ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ न्यायशाखेची परवानगी मिळवली, तेव्हा कार्यवाहीची अचूकता किंवा परवानगी देणाऱ्या आदेशाची वैधता प्रतिवादीकडून प्रश्नार्थ केली जाऊ शकते किंवा तो आक्षेप त्याच्या द्वारे माफ केला जाऊ शकतो. जेव्हा त्याने प्रकरण लवादकडे न्यायालयाच्या माध्यमातून संदर्भित करण्यासाठी सहमती दर्शवली, तेव्हा त्याने आपल्या लेखी उत्तरात न्यायालयाच्या अधिकारीतेवरील आक्षेप माफ केला असे मानले जाईल. हे स्थापित आहे की न्यायालयाच्या स्थानिक अधिकारीतेवरील वरील आक्षेप न्यायालयाच्या खटला चालवण्याच्या क्षमता संदर्भातील आक्षेपाशी समान नाही. न्यायालयाची खटला चालवण्याची क्षमताही अधिकारीतेच्या मुळाशी संबंधित आहे आणि जेव्हा ती क्षमता नाही, तेव्हा ती अंतर्निहित अधिकारीतेच्या अभावाचे प्रकरण आहे. दुसरीकडे, न्यायालयाच्या स्थानिक अधिकारीतेवरील आक्षेप माफ केला जाऊ शकतो आणि या तत्वाला दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम २१ अंतर्गत कायद्याद्वारे मान्यता देण्यात आली आहे.”

(यावर भर देण्यात आला.)

हर्षद चिमन लाल मोदी विरुद्ध डीएलएफ युनिव्हर्सल लिमिटेड[9] या प्रकरणात या न्यायालयाने नमूद केले की प्रादेशिक आणि आर्थिक अधिकारीतेवरील आक्षेप लवकरात लवकर संधी मिळताच घेतला पाहिजे. जर तो तात्काळ घेतला गेला नाही, तर तो नंतर जाऊ शकत नाही. या न्यायालयाने नमूद केले कि :

> "३०. एका न्यायालयाच्या अधिकारीतेला अनेक श्रेणींमध्ये वर्गीकृत केले जाऊ शकते. महत्त्वाच्या श्रेण्या आहेत (१) स्थानिक किंवा प्रादेशिक अधिकारिता; (२) आर्थिक अधिकारिता; आणि (३) विषय अधिकारक्षेत्र. जिथे प्रादेशिक आणि आर्थिक अधिकारीतेचा संबंध आहे, तिथे अशा अधिकारीतेवर आक्षेप लवकरात लवकर संधी मिळताच आणि कोणत्याही परिस्थितीत मुद्दे निकाली काढण्यापूर्वी घेतला पाहिजे. या बाबतीत कायदा स्पष्ट आहे की जर असे आक्षेप लवकर घेतले गेले नाहीत, तर ते नंतर घेतले जाऊ शकत नाहीत. परंतु, विषय अधिकारिता ही पूर्णपणे वेगळी आहे आणि एक वेगळ्या आधारावर उभी आहे. जेव्हा एखाद्या न्यायालयाला कालमर्यादेनुसार, चार्टरनुसार किंवा आयोगानुसार दिलेल्या कोणत्याही मर्यादेमुळे विषय अधिकारिता नसते, तेव्हा ते न्यायालय त्या कारणावर किंवा विषयावर निर्णय घेऊ शकत नाही. अशा न्यायालयाने पारित केलेला आदेश निरर्थक

---

9 (२००५) ७ एससीसी ७९१

असतो."

हशम अब्बास सय्यद विरुद्ध उस्मान अब्बास सय्यद[10] या प्रकरणात, या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नमूद केले की :

"२४. तथापि, आम्ही हे वेगाने समाविष्ट करण्यास तयार आहोत की, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ च्या आधारावर, ज्याला प्रादेशिक किंवा आर्थिक अधिकारिता नाही अशा न्यायालयाने पारित केलेल्या आदेशामध्ये, आणि त्या विषयाबद्दल अधिकारिता नसलेल्या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशामध्ये भेद केला पाहिजे. जिथे पहिल्या प्रकरणात, अपिलीय न्यायालय आदेशात हस्तक्षेप करू शकत नाही जोपर्यंत परिणाम झालेचे दाखवले जात नाही, सामान्यत: दुसऱ्या श्रेणीतील प्रकरणांमध्ये हस्तक्षेप केला जाईल."

त्याचप्रमाणे, **मंटू सरकार विरुद्ध ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि** [11] या प्रकरणात, या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नमूद केले कि:

"२०. तथापि, दाव्याच्या संदर्भातील अधिकारिता आणि प्रादेशिक व आर्थिक अधिकारिता यामध्ये भेद केला पाहिजे. जिथे पहिल्या श्रेणीत येणाऱ्या प्रकरणात

10 (२००७) २ एससीसी ३५५
11 (२००९) २ एससीसी २४४

न्यायनिर्णय निरर्थक असावा, तिथे दुसऱ्या श्रेणीत तो असावा. हे असे प्रकरण नाही जिथे न्यायाधिकरणास दावा विषयावर अधिकारिता नाही. आमच्या मते, न्यायालयाने, प्रथम उत्तरवादीस पूर्वग्रह झाल्याचा निष्कर्षाअभावी, अपील स्वीकारु नये."

१४. प्रस्तुत प्रकरणात अंमलबजावणी कार्यवाहीत जो आक्षेप घेतला गेला तो दाव्याच्या विषयाशी संबंधित नाही. तो आक्षेप प्रादेशिक अधिकारीतेसंदर्भात होता जो दिवाणी न्यायालयाच्या अधिकारीतेच्या अभावी किंवा खटल्यास मान्यता देण्याच्या अंतर्निहित अधिकारीतेशी संबंधित नाही. अंमलबजावणी न्यायालय आदेशाची पडताळणी करू शकत नाही आणि आदेश जसा आहे तसाच अंमलात आणावा लागतो. **वसुदेव धनजीभाई मोदी विरुद्ध राजाभाई अब्दुल रहमान**[12] या प्रकरणात,अर्जदाराने अहमदाबादच्या लघुवाद न्यायालयात प्रतिवादी -भाडेकरूची हकालपट्टी करण्यासाठी दावा दाखल केला. त्या प्रकरणात अखेरीस या न्यायालयाने त्याच्या बाजूने निर्णय दिला. अंमलबजावणी कार्यवाही दरम्यान, भाडेकरूने सांगितले की लघुवाद न्यायालयास दावा चालवण्याची अधिकारिता नाही आणि त्याचा आदेश निरर्थक आहे. अंमलबजावणी न्यायालय आणि लघुवाद न्यायालयाने या युक्तिवादाला नाकारले. उच्च न्यायालयाने लघुवाद न्यायालयाचा आदेश

12 (१९७०) १ एससीसी ६७०

उलटवला आणि अंमलबजावणीसाठी दाखल केलेला अर्ज फेटाळला . या न्यायालयात अपील दाखल केल्यावर, तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय उलटवला आणि नमूद केले की :

> "६. एक न्यायालय जे आदेशाची अंमलबजावणी करते ते आदेशाची पडताळणी करू शकत नाही: पक्षकारांदरम्यान किंवा त्यांचे प्रतिनिधींनी आदेशास त्याच्या स्वरूपानुसार स्वीकारले पाहिजे, आणि आदेश कायद्यात किंवा तथ्यांमध्ये चुकला आहे असा कोणताही आक्षेप घेतला जाऊ शकत नाही. जोपर्यंत तो योग्य अपील किंवा पुनरीक्षण कार्यवाही द्वारे रद्द केला जात नाही तो पर्यंत. आदेश, जरी तो चुकीचा असला तरी तो पक्षकारांदरम्यान बंधनकारक असतो.
>
> ८. जर आदेश अभिलेखावर स्पष्टपणे अधिकारीतेशिवाय असेल आणि प्रश्न प्रादेशिक अधिकारीतेशी संबंधित नसेल किंवा तो दावा मूल्यांकन अधिनियमाचे कलम ११ अंतर्गत नसेल, तर आदेश पारित करणाऱ्या न्यायालयाच्या अधिकारीतेविरुद्ध आक्षेप घेता येईल जेथे आदेश पारित करणाऱ्या न्यायालयास दावा स्वीकारण्याची आणि चालवण्या ची अधिकारिता नाही हे ठरवण्यासाठी तथ्यांची पडताळणी करणे आवश्यक

असेल, तेथे अंमलबजावणी कार्यवाहीत या प्रकारचा आक्षेप घेता येणार नाही."

१५. या पार्श्वभूमीवर, आमचे मत असे आहे की उच्च न्यायालयाने या निष्कर्षाप्रत येण्यास स्पष्टपणे चूक केली की अंमलबजावणी न्यायालयाच्या अधिकारितेत हे ठरवणे अंतर्भूत होते कि वाटणीच्या दाव्यात पारित केलेला आदेश प्रादेशिक अधिकारक्षेत्राअभावी पारित केला गेला होता का ?

१६. उत्तरवादीने प्रथम अपील (प्रथम अपील क्र. ४३/२०१५) दाखल केले, ज्यात अधिकारीतेचा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. आम्हाला स्पष्ट करायचे आहे की, प्रस्तुतच्या न्यायनिर्णयातील निष्कर्ष प्रथम अपीलामध्ये पक्षकारांच्या हक्कांवर आणि युक्तिवादांवर परिणाम करणार नाही.

१७. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे अधिकारीतेच्या मर्यादेचा अतिरेक केला आहे, कारण त्याने अंमलबजावणी न्यायालयाचा निर्णय उलटवला, ज्याने योग्यरित्या आदेशाच्या अंमलबजावणीवरील आक्षेप, त्या न्यायालयाला प्रादेशिक अधिकारिता नसल्याच्या कारणावर स्वीकारण्यास नकार दिला होता.

१८. आम्हाला युक्तिवादात कोणतीही गुणवत्ता आढळत नाही की उच्च

न्यायालयाचा आक्षेपित आदेश, जो पुनर्विचार आदेश आहे, हा एक अंतरिम आदेश आहे जो कोणत्याही हस्तक्षेपास अनुमती देत नाही. आक्षेपित आदेशाद्वारे, उच्च न्यायालयाने अंमलबजावणी न्यायालयाला प्रादेशिक अधिकारितेच्या अभावी पारित केलेल्या आदेशाच्या वैधतेवर आक्षेप स्वीकारण्याचे निर्देश दिले आहेत. अशा प्रकारचा आदेश अंमलबजावणी न्यायालयापुढे घेतला जाऊ शकत नाही. शिवाय, रांची येथील मालमत्ता सामायिक पूर्वजांची नसल्याचा आक्षेप ही गुणात्मक बाब आहे, तो जर आवश्यक असेल तर, प्रथम अपीलात संबंधित न्यायालयासमोरच घेतला गेला पाहिजे.

१९. वरील कारणांसाठी, आम्ही अपील मंजूर करतो आणि उच्च न्यायालयाचा आक्षेपित न्यायनिर्णय व आदेश रद्द करतो. अंमलबजावणी न्यायालयाने अंमलबजावणीची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. खर्चासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

अपील मंजूर.

———————

-: अस्वीकरण :-

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-XXXXX-